दैनिक
अन्यायाचा प्रतिकार — महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
# रायगड नगरी
● वर्ष १६ वे ● अंक २७६ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.३१ डिसेंबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

### कोरोनाच्या वाढत्या रुग्ण संख्येच्या पार्श्वभूमीवर

# महाराष्ट्रासह ८ राज्यांना कठोर पाऊले उचलण्याच्या केंद्राच्या सुचना

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

**देशात कोरोना रुग्णांची संख्या वाढल्यानंतर केंद्र सरकारने राज्यांना सतर्क केले आहे. केंद्र सरकारने ८ राज्यांना विशेष सूचना जारी केल्या आहेत. राज्यांनी आपापल्या परीने कोरोना विरोधात कठोर पावले उचलावीत जेणेकरून तिसरी लाट घातक होण्यापासून रोखता येईल. केंद्रीय आरोग्य सचिव राजेश भूषण यांनी दिल्ली, हरयाणा, तामिळनाडू, पश्चिम बंगाल, महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक आणि झारखंडला आज पत्र लिहिले आहे.**

आरोग्य सचिवांनी या ८ राज्यांना कोरोनाविरोधात कठोर पावले उचलण्यास सांगितले आहे. यासोबतच कोरोना चाचणी आणि लसीकरणाचा वेग वाढवण्याचा सल्ला पत्रातून देण्यात आला आहे. देशात आतापर्यंत ओमिक्रॉनचे एकूण ९६१ रुग्ण आढळले आहेत. देशात २९ डिसेंबरला कोरोना रुग्णांमध्ये ४४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. ही वाढ ओमिक्रॉनमुळे झाल्याचे सांगितले जात आहे.

देशात ३३ दिवसांत प्रथमच १० हजारांहून अधिक करोनाचे नवीन रुग्ण आढळून आले आहेत.



गेल्या २४ तासांत देशात १३ हजारांहून अधिक रुग्ण आढळून आले आहेत. यामुळे देशाने अलर्ट राहणं गरजेचं आहे, असं केंद्रीय आरोग्य मंत्रालयाचे सह सचिव लव अग्रवाल यांनी सांगितलं. गेल्या आठवड्यात देशात रोज ८ हजारांहून अधिक रुग्णांची नोंद झाली. २६ डिसेंबरनंतर रोज १० हजार रुग्ण आढळून येत आहेत. महाराष्ट्र आणि केरळमध्ये सर्वाधिक १० हजारांहून अधिक ॲक्टिव्ह रुग्ण आहेत. केंद्रीय आरोग्य विभागाने आज सकाळी आकडेवारी जाहीर केली. गेल्या २४ तासांत कोरोनाचे १३ हजार १५४ रुग्ण आढळले आहेत. बुधवारच्या तुलनेत ही संख्या ४ हजारांनी अधिक आहे. त्याच वेळी एका दिवसात २६८ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. कोरोनामुळे बिघडत चाललेली परिस्थिती पाहता महाराष्ट्र, दिल्ली, उत्तर प्रदेश, हरयाणा, गुजरात, मध्य प्रदेश आणि कर्नाटकमध्ये रात्रीचा कर्फ्यू जाहीर करण्यात आला आहे. यासोबतच या ७ राज्यांमध्ये कोविड प्रोटोकॉलही लागू करण्यात आला आहे.

## नववर्षाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेची सर्वत्र कडक कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोरानाचे वाढते रुग्ण पहाता आणि नववर्षाच्या पार्श्वभूमीवर विना मास्क फिरणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यासाठी पोलिस विभागाच्या मदतीने महापालिकेने पालिकेने प्रत्येक प्रभागानूसार पालिकेच्या ५० अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. यासंदर्भात आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात नुकतीच बैठक घेण्यात आली यावेळी आयुक्त श्री.गणेश देशमुख यांनी अधिकारी व कर्मचा–यांना कारवाई संदर्भात सूचना दिल्या. यापुढे महापालिका क्शन मोडवर राहणार असून नववर्षाच्या पार्श्वभूमीवर शासनाने दिलेल्या आदेशांचे पालन न करणाऱ्या नागरिकांवर कडक कारवाई करण्यात येणार आहे.



नवीनवर्षाच्या स्वागतासाठी आयोजित करण्यात आलेले कार्यक्रम मर्यादित प्रमाणात करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत. कोरोना विषाणूच्या संक्रमणाच्या पार्श्वभूमीवर गेल्या काही दिवसांमध्ये ओमिक्रॉन ही नवीन विषाणू प्रजाती आढळून आल्यामुळे संसर्गाचा नवीन धोका निर्माण झाला आहे. याओमिक्रॉन विषाणू प्रजातीचे संक्रमण सामान्य नागरिकांमध्ये/रहिवाशांमध्ये फार मोठ्या तीव्रतेने पसरण्याची दाट शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आरोग्याच्या दृष्टीने खबरदारी म्हणून मोठ्या प्रमाणात एकत्र न येता या वर्षी ३१ डिसेंबर, २०२१ (वर्ष अखेर) व नूतन वर्ष २०२२ चे स्वागत अत्यंत साधेपणाने करण्याच्या सूचना नागरिकांना देण्यात आल्या आहेत. कोरोनाच्या अनुषंगाने दि. ३१ डिसेंबर, २०२१ रोजी व दि. १ जानेवारी, २०२२ रोजी नववर्ष स्वागताच्या निमित्ताने नागरिकांनी घराबाहेर न पडता नववर्षाचे स्वागत शक्यतोवर घरी चसाधेपणाने साजरे करावे. रात्री ९:०० ते सकाळी ६:०० वाजेपर्यंत ५ पेक्षा अधिक व्यक्तींनी एकत्र येण्यावर बंदी घालण्यात आली आहे, सदर आदेशांचे पालन न करणाऱ्या नागरिकांवर कडक कारवाई पालिका व पोलिस प्रशासनाच्या वतीने करण्यात येणार आहे. ३१ डिसेंबर, २०२१ व नूतन वर्ष, २०२२ चे स्वागताकरिता आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांना बंदिस्त सभागृहात उपलब्ध आसनक्षमतेच्या ५०% पर्यंत तर खुल्या जागेत आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांना उपलब्ध क्षमतेच्या २५% च्या मर्यादेत उपस्थित राहण्यास परवानगी असणार असून सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारे गर्दी होणार नाही व सोशल डिस्टसिंग राखले जाईल, मास्क व सॅनिटायझरचा वापर होईल याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. तसेच त्याठिकाणी निर्जंतूकीकरणाची व्यवस्था करण्यात यावी. अशा सूचना आयुक्तांनी यावेळी दिल्या.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ६० वर्षावरील नागरिकांनी व दहा वर्षांखालील मुलांनी सुरक्षिततेच्या व आरोग्याच्या दृष्टीने शक्यतोवर घराबाहेर जाणे टाळावे. नववर्षाच्या स्वागताच्या निमित्ताने कोणत्याही प्रकारे धार्मिक/सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करू नये तसेच मिरवणुका काढण्यात येऊ नयेत. नूतन वर्षाच्या पहिल्या दिवशी बहुसंख्य नागरिक धार्मिक स्थळी जात असतात. अशावेळी त्या ठिकाणी एकाच वेळी गर्दी न करता सोशल डिस्टन्सींगचे पालन करावे. तसेच संबंधितांनी आरोग्य व स्वच्छतेच्या दृष्टीकोनातून योग्य त्या खबरदारीच्या उपाययोजना कराव्यात. आयुक्तांनी दिलेल्या .../२

## येत्या काळात जनता काँग्रेसच्या बाजूने राहील : महेंद्र घरत

### सागर जाधव, इर्शाद शेख यांच्यासह शेकडो महिला व युवकांचा काँग्रेसमध्ये प्रवेश

**दै.रायगड नगरी । खोपोली**

खोपोली शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने शहर अध्यक्ष रिचर्ड जॉन यांच्या नेतृत्वाखाली मुस्लिम वेलफेअर हॉल येथे भारतीय राष्ट्रीय काँग्रेस स्थापना दिवसानिमित्त कार्यकर्ता मेळावा व प्रवेश सोहळा आयोजित करण्यात आला आता. यावेळी काँग्रेसचे जिल्हा महेंद्रशेठ घरत यांच्या उपस्थितीत युवा नेते सागर जाधव व इर्शाद शेख यांच्यासह शेकडो युवक व महिलांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला.

यावेळी जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, देशाच्या प्रगतीत काँग्रेसचा मोलाचा वाटा असून देशाला स्वतंत्र मिळविण्यासाठी काँग्रेसची भुमिका महत्त्वाची आहे. त्यामुळे कोणीही काँग्रेस विरोधात बोलू दे त्याचा काही फायदा नाही तर सर्वसामान्य जनतेला काँग्रेसचे कार्य माहित असून येत्या काळात ते काँग्रेसच्या बाजूने राहतील यात तिळमात्र शंका नाही, असा विश्वास त्यांनी व्यक्तियों केला.

खोपोली शहरात रिचर्ड जॉन यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसची घोडदौड सुरू असून रिचर्ड जॉन यांची शहर अध्यक्षपदी वर्णी लागल्यानंतर शहरात काँग्रेसला नवसंजीवनी मिळू लागली असता शहरातील असंख्य प्रश्नावर काँग्रेस आक्रमक पवित्रा घेताना .../२



## संक्षिप्त...

### मुंबईवर दहशतवादी हल्ल्याचे सावट; पोलिसांच्या सुट्ट्या केल्या रद्द

**दै.रायगड नगरी । मुंबई**

सध्या मुंबईसह राज्यात कोरोनाचे संकट वाढत असल्याने नववर्षाचे सेलिब्रेशन घरीच करण्याचे प्रशासनाने आवाहन केले आहे. तसेच कलम १४४ लागू असल्याने पार्ट्यांवर एकप्रकारे निर्बंध लागू करण्यात आले आहेत. मात्र या नववर्षाच्या जल्लोषाला दहशतवादी गालबोट लावण्याची शक्यता आहे. नव वर्षाच्या पूर्वसंध्येला मुंबईवर खलिस्तानी संघटना दहशतवादी हल्ले करू शकतात, अशी माहिती केंद्रीय गुप्तचर यंत्रणांना मिळाली आहे. या माहितीमुळे मुंबई पोलीस सावध झाले असून सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांच्या आणि इतर सर्व सुट्या रद्द करण्यात आल्या आहेत.

मुंबईमध्ये हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. मुंबई पोलिसांच्या उद्या म्हणजेच ३१ डिसेंबरची साप्ताहिक आणि सर्व सुट्या रद्द करण्यात आल्या आहेत.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, केंद्रीय गुप्तचर यंत्रणांना मुंबईवर उद्या दहशदवादी हल्ला होणार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. म्हणूनच सतर्कता म्हणून मुंबई पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त असणार आहे. तसेच मुंबई पोलिसांची उद्याची सुट्टी रद्द केल्या आहेत. मुंबईतील महत्वाचे स्थानकं असलेल्या दादर, वांद्रे, चर्चगेट, सीएसएमटी, कुर्ला आणि इतर गर्दीच्या रेल्वे स्थानकांवर कडक पोलीस पहारा तैनात करण्यात येणार आहे.

## महावितरणला चार दिवसांनी जाग

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत तालुक्यातील मोग्रज ग्रामपंचायतमधील चौधरवाडी मध्ये बैलांच्या झोम्बीत चार विजेचे खांब कोसळले होते. तेथील ग्रामपंचायत कडून सडलेले लोखंडी खांब बदलण्याची मागणी अनेक वर्षे केली होती. ते सडलेले विजेचे खांब २६ डिसेंबर रोजी रात्री कोसळले होते. त्यांनतर तब्बल चार दिवस अंधार सहन केल्यानंतर आज नवीन विजेचे खांब उभे केल्यावर तेथील अंधार दूर झाला आहे.

मोग्रज ग्रामपंचायत मधील चौधरवाडी मध्ये ६५ घरांची वस्ती आहे. तेथील आदिवासी लोकांच्या वस्तीमध्ये अनेक विजेचे खांब हे लोखंडी असून ३० वर्षांपूर्वी ते खांब टाकण्यात आले आहेत. त्यातील बहुतेक विजेच्या खांबांना गंज लागल्याने ते सडलेले आहेत. त्याबाबत तत्कालीन उपसरपंच विलास भला यांनी महावितरण कंपनीकडे नवीन विजेचे खांब बसविण्याची मागणी केली होती. मात्र सडलेले विजेचे खांब महावितरण कंपनी कडून बदलण्यात येत नव्हते. त्यात २६ डिसेंबर



च्या रात्री काही मोकाट जनावरे यांच्यात झोम्बी झाली आणि त्यांची झोम्बी गावातील सडलेल्या विजेच्या खांबाला जाऊन धडकली. त्यावेळी बैलांच्या धडकेत चक्क चार विजेचे खांब कोसळले आणि चौधरवाडीची वीज बंद .../२

## अटल करंडक एकांकिका स्पर्धेच्या प्राथमिक फेरीला पुण्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा व खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालय (स्वायत्त) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय आठव्या अटल करंडक एकांकिका स्पर्धेच्या प्राथमिक फेरीला सुरुवात झालेली आहे. यातील पुणे केंद्रांतर्गत प्राथमिक फेरी नुकतीच झाली. नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष व पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी येथे भेट देऊन स्पर्धकांना प्रोत्साहन दिले.



अखिल भारतीय नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली होत असलेल्या यंदाच्या राज्यस्तरीय अटल करंडक एकांकिका स्पर्धे त प्राथमिक फेरीसाठी महाराष्ट्रातून १०८ संस्थांनी नोंदणी केली आहे. या स्पर्धेत जळगाव व नागपूर केंद्रांनंतर पुणे केंद्रासाठीची प्राथमिक फेरी २५ व २६ डिसेंबर रोजी रामकृष्ण मोरे सभागृहात रंगली. पुणे केंद्रावरील प्राथमिक फेरीत १८ एकांकिका संस्थांनी सहभाग घेत प्रतिसाद लाभला. या वेळी स्पर्धा प्रमुख गणेश जगताप, खजिनदार .../२

## गव्हाण न्हावा गावांचा पाणीपुरवठा तातडीने सुरळीत करा : ना.आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गेली २ महिने गव्हाण, न्हावा, न्हावाखाडी, बेलपाडा, कोपर, शेलघर, शिवाजीनगर गावांना सिडको - MIDC - च्या मोगलाई धोरणामुळे भीषण पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे हजारो महिला वर्ग संतप्त झालेला आहे. या संदर्भात रायगड जिल्हा काँग्रेस अध्यक्ष महेंद्र घरत यांच्या मागणी नुसार रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांनी MIDC - CIDCO, नवी मुंबई महानगरपालिका अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय बैठक खासदार सुनिल



तटकरे व महेंद्र घरत यांच्या उपस्थितीत बोलावली. यावेळी गव्हाण, न्हावा ग्रामपंचायतीचे सरपंच – उपसरपंच उपस्थित होते.

यावेळी स्थानिक भूमिपुत्रांना गेली ३५–४० वर्षे सुरळीत सुरु असलेला पाणीपुरवठा CIDCO - MIDC - नवी मुंबई महानगरपालिका यांच्या पाणी वाटप करार न पाळल्यामुळे नाहक या गावांचा व ओ.एन.जी.सी. सप्लाय बेसचा पाणीपुरवठा हि खंडित करण्यात आलेला आहे. हा प्रश्न गांभीर्याने घेत पालकमंत्र्यांनी व खासदारांनी सर्व अधिकाऱ्यांना सज्जड दम भरला व तुमच्या अनागोंदी कारभारामुळे प्रकल्पग्रस्त पाण्यासाठी वंचित असता कामा नये, व तातडीने न्हावा – गव्हाण ग्रामपंचायतीच्या हद्दीतील .../२

## सुकापूरमध्ये कुत्र्यांचा उच्छाद ; एकाच दिवशी तिघांचे तोडले लचके

**दै.रायगड नगरी । पनवेल**

सुकापूर परिसरात मोकाट कुत्र्यांनी उच्छाद मांडला असून बुधवारी एकाच दिवशी या कुत्र्यांनी तिघांचे लचके तोडल्याची धक्कादायक घटना घडली आहे. सदर घटनेने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

नवीन पनवेल आयप्पा मंदिरापासून सुकापूर प्राथमिक शाळा या मार्गावर भटक्या कुत्र्यांचे कलप खुलेआमपणे फिरताना दिसतात. या परिसरात मच्छी विक्रेते, चिकन विक्रेते मोठ्या प्रमाणात आहेत.

सदर विक्रेत्यांकडून या भटक्या कुत्र्यांना खाण्यासाठी मांसाहारी पदार्थ मोठ्या प्रमाणात टाकले जातात. त्याच प्रमाणे प्राणी मित्रांकडूनही या भटक्या कुत्र्यांना रोज अन्नपदार्थ टाकले जातात असेही येथील नागरिकांचे म्हणणे आहे. या मुळेच सदर परिसरामध्ये मोकाट कुत्र्यांची संख्या दिवसेंदिवस खूपच वाढत चालली आहे.

या भागातून प्रवास करणाऱ्या नागरिकांना याचा विशेष त्रास होत असून विशेषतः रात्री अपरात्री कामावरून तसेच दुचाकीवरून येणाऱ्या नागरिकावर या कुत्र्यांनी हल्ला केल्याच्या घटना अनेकदा घडल्या आहेत.

सदर भटक्या कुत्र्यांच्या त्रासामुळे येथील नागरिक कमालीचे त्रस्त झाले असून या भटक्या कुत्र्यांचा येथील प्रशासनाने त्वरित बंदोबस्त करावा अशी नागरिकांनी मागणी केली आहे.

# काही अधिक; काही उणे

विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन खरे म्हणायचे झाल्यास बऱ्या वातावरणात पार पडले. गेल्या काही वर्षांपासून संसदीय लोकशाहीचे अन्वयार्थ वेगवेगळ्या पद्धतीने व अनेकदा स्वतःला हवे तसे काढण्याचा प्रघात सुरू झाला आहे. त्यामुळे राज्यांमधील विधानसभा असतील वा देशाची संसद असेल, चर्चा, मतमतांतरे, संसदीय भाषा, संसदीय नियमावलीने लोकप्रतिनिधींना दिलेली विविध आयुधे, अध्यक्ष, सभापती या आसनांवर बसलेल्यांचा निःपक्षपातीपणा आदी बाबींविषयी अगदी काटेकोर अपेक्षा ठेवणे फोल आहे. त्यामुळेच, हिवाळी अधिवेशनातही विरोधकांचा गोंधळ, मांजराचा आवाज, अध्यक्षपदाच्या निवडणुकीचा नेहमीप्रमाणे उडालेला फज्जा आदी गोष्टी झाल्याच. पण तसे असले तरी पाच दिवसांच्या या अधिवेशनात दिवसभरासाठी एकदाही सभागृह तहकूब झाले नाही. महिला सुरक्षेबाबत अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या 'शक्ती कायद्या'सह एकोणीस विधेयके सत्ताधारी व विरोधी बाकांवरील प्रमुख आमदार, विरोधी पक्षनेते आदींनी केलेल्या सखोल चर्चेसह मंजूर झाली. या अधिवेशनाच्या काही काळ आधीच मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर झालेल्या शस्त्रक्रियेमुळे ते या अधिवेशनाला उपस्थित राहणार का, याबाबत शंका होत्याच. उद्धव ठाकरे या अधिवेशनाला उपस्थित न राहिल्यामुळे अधिवेशनात प्रमुख नेते म्हणून उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या खांद्यावरच सगळी धुरा होती. ती धुरा त्यांनी चांगली सांभाळली. अनेक कटू प्रसंग येण्याची शक्यता या पाच दिवसांमध्ये उभी राहिली होती. मात्र, अजित पवार यांनी राजकीय कौशल्य पणाला लावून हे प्रसंग उद्भवू दिले नाहीत. अधिवेशन काळात पायऱ्यांवर बसून आंदोलन करताना पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांना खिजवण्यासाठी एका विरोधी आमदाराने काढलेल्या मांजराच्या आवाजामुळे शिवसेना सदस्य अत्यंत आक्रमक झाले. या प्रसंगापूर्वीच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नक्कल करतात म्हणून शिवसेनेच्या भास्कर जाधव यांना माफी मागावी लागली होती. त्याकरिता, विरोधकांनी टाकलेल्या दबावापुढे सरकारला झुकावे लागले. यामुळे या नव्या मुद्द्यावरून शिवसेना मागे हटण्याच्या मनस्थितीत नव्हती. मात्र, अजित पवार यांनी सभागृहातील सर्वपक्षीय सदस्यांना समज दिली. विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनीही असे वर्तन योग्य नसल्याचे म्हणत या वादावर पडदा पाडला. मुख्य म्हणजे, गेल्या काही वर्षांत विधेयकांवर चर्चा होऊन ती संमत होण्याची संसदीय प्रथा बंदच पडली आहे. संसदेतच या प्रथेला हरताळ फासण्यात आला असल्याने ज्या संसदेचे अनुकरण राज्यांमधील विधिमंडळे करतात; तेथे फार काही वेगळे होण्याची अपेक्षा नाही. मात्र, पाच दिवसांचे असूनही प्रत्येक विधेयकावर दोन्ही बाजूंनी चांगली चर्चा घडली, हा या अधिवेशनातील सर्वांत सकारात्मक भाग म्हणायला हवा. शेवटच्या दिवशी तर सकाळी अकरापासून सायंकाळी सहापर्यंत केवळ विधेयकांवरच चर्चा झाली. नाही म्हणायला शेवटच्या दिवशी अधिवेशन संपता संपता प्र-कुलपतींच्या नियुक्तीच्या विधेयकावर विरोधकांनी जोरदार आक्षेप घेत गोंधळ घातला. खरे तर, विधानसभा अध्यक्ष निवडीचे नवे नियम कायद्याच्या चौकटीत तपासून पाहावे लागेल, असे पत्र राज्यपालांनी पाठविले होते. त्यांनी ही निवडणूक घेण्यास जवळपास नकारच दिल्याने राज्यपाल विरुद्ध राज्य सरकार हा संघर्ष उभा राहिला. असा संघर्ष भविष्यात होऊ शकतो, हे आधीचे विधानसभा अध्यक्ष नाना पटोले यांचा राजीनामा घेण्यापूर्वी काँग्रेसच्या केंद्रीय नेत्यांना समजायला हवे होते. मात्र, सध्या दिल्लीत काँग्रेसचे नेतृत्व म्हणजे नक्की कोण, हेच कुणाला माहीत नसल्याने 'आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय' अशी अवस्था आहे. राज्यपालांनी काढलेल्या तांत्रिक मुद्द्याला नैतिक आधार किती? यावर चर्चा होऊ शकते. मात्र, कायद्याच्या चौकटीबाबत त्यांच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष करण्याची हिंमत सरकार दाखवू शकत नसल्यामुळेच ही निवडणूक पुढे ढकलण्याचा निर्णय तिन्ही पक्षांच्या प्रमुख नेत्यांना आयत्यावेळी घ्यावा लागला. त्या पार्श्वभूमीवरच राज्यपालांचे कुलगुरू नियुक्तीचे अधिकार मर्यादित करणारे विधेयक संमत करण्यासाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी रणनीती आखणे गरजेचे होते. हे विधेयक संमत झाले; तरी तीनही पक्षांचा पहिल्या बाकावरील एकही प्रमुख मंत्री सभागृहात उपस्थित नव्हता. ज्येष्ठांपैकी केवळ छगन भुजबळ, काँग्रेसचे सुनील केदार, सेनेचे अनिल परब, आदित्य ठाकरे अशा नेत्यांना पाहून विरोधक आक्रमक झाले होते. हे विधेयक संमत झाले. अन्यथा आघाडीला राज्यपालांच्या मुद्द्यावरून मिळालेला हा दुसरा धक्का ठरला असता. वीजबील माफी, अमरावती दंगल, राज्यातील वाढती गुन्हेगारी, विविध मतदारसंघांमधील स्थानिक प्रश्न, आदींवर तारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना, औचित्याचा मुद्दा आदी आयुधांखाली अनेक सदस्यांनी केलेल्या चर्चेतून अनेक महत्त्वाचे निर्णय घेणे सरकारला भाग पडले. त्यामुळेच एकही दिवस सभागृह पूर्ण काळासाठी बंद न पडलेल्या या अधिवेशनाला 'बरा' हा दर्जा द्यावाच लागेल.

# बोर्झे ग्रामपंचायतचे माजी सरपंच महेंद्र ठाकूर राष्ट्रवादीत

**दै.रायगड नगरी । पेण**



पेण येथील बोर्झे ग्रामपंचायतचे माजी सरपंच व उद्योजक महेंद्र ठाकूर यांनी आपल्या ग्रामविकास सामाजिक संस्थेच्या शेकडो कार्यकर्त्यांसह बुधवारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. बोर्झे येथे झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस खासदार सुनील तटकरे यांनी महेंद्र ठाकूर यांच्या सह कार्यकर्त्यांचे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये मध्ये स्वागत केले.

या पक्षप्रवेश कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसचे रायगड जिल्हा सरचिटणीस विकास म्हात्रे, जगन म्हात्रे, विधानसभा अध्यक्ष नरेंद्र ठाकूर, पेण शहराध्यक्ष जितेंद्र ठाकूर, रायगड जिल्हा उपाध्यक्ष यशवंत घासे, पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष मंगेश नेने, पेण तालुकाध्यक्ष दयानंद भगत, वडखळ सरपंच राजेश मोकल, हमरापूरचे सरपंच प्रदीप म्हात्रे, झेन नाईक, उदय जवके, विजय कदम, अनंत ढेने, गंगाधर पाटील, चैत्राली पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना खासदार सुनील तटकरे म्हणाले कि, बोर्झे गाव आज राष्ट्रवादी मय झाले. पेण तालुक्यातील राजकारण बदलत आहे. राष्ट्रवादी मध्ये अनेक कार्यकर्ते प्रवेश करत आहेत. महेंद्र ठाकूर यांच्या कल्पक विचारा मुळे कोणत्याही शासकीय अनुदान शिवाय बोर्झे गावाला शुद्ध पाणीपुरवठा होत असून या गावा बरोबरच परिसरातील इतर गावांमध्ये देखील पिण्याचे पाणी पुरवठा होत आहे. खारेपाट विभागात पश्चिम महाराष्ट्र, नाशिकच्या धर्तीवर पॉलिहाऊस उभारुन त्यांनी येथील तरुणां समोर वेगळा आदर्श उभा केला असून या पॉलिहाऊस मुळे महिलांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

खारेपाट विभाग कष्टकरी समाजाचा आहे. मुंबई जवळ आहे तरी ही वाशी खा-रेपाट विभाग आज पिछाडीवर असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. खारेपाट विभागातील पाणी प्रश्न सोडवण्यासाठी आपण कटीबद्ध असल्याचे देखील खासदार तटकरे यांनी यावेळी म्हटले. या विभागातील बॅकलॉग भरुन पुढील दोन पाच वर्षात या भागातील चित्र बदलेल असा विश्वास देखील खासदार सुनील तटकरे यांनी यावेळी व्यक्त केला. बोर्झे गावाच्या विकासासाठी दहा लाख रुपयांचा निधी देण्याची घोषणा खासदार तटकरे यांनी यावेळी केली.

यावेळी माजी सरपंच महेंद्र ठाकूर यांनी ग्रामविकास सामाजिक संस्थेच्या माध्यमातून विकास करण्यात आपण यशस्वी झालो असल्याचे म्हटले. गावातील पाणी टंचाईचा मुख्य प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही स्वतः प्रयत्न केला व आमच्या गावासह इतर गावांना फिल्टर पाणीपुरवठा करणारी आमची ग्रामपंचायत ही महाराष्ट्रातील पहिली ग्रामपंचायत असल्याचे म्हटले. या उपक्रमाला सर्व स्तरातून चांगली प्रतिसाद मिळाला असून शासनाने देखील या उपक्रमाची दखल घेतली असल्याचे सांगितले. बचत गटांच्या मार्फत जमिनीची धूप रोखण्यासाठी खाडी किनारी खारफुटी वृक्षांची लागवड केली असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

# ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेच्या कोल्हापूर येथील धरणे आंदोलनात रायगड मधून ४०० कर्मचारी सहभागी होणार : मंगेश म्हात्रे

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना यावलकर समितीच्या शिफारशी मान्य करून वेतन विषयक आर्थिक लाभ मिळावा, दहा ऑगस्ट २०२० रोजी जाहीर केलेल्या किमान वेतनाची तरतूद करण्यात यावी, किमान वेतन मिळण्यात वसूली,उत्पन्नाची अट असलेला शासन निर्णय, लोकसंख्येचा जाचक आकृतीबंध रद्द करण्यात यावा, राहणीमान भत्ता शासनाच्या तिजोरीतून शंभर टक्के द्यावा, कर्मचा-यांना जि.प.सेवेत सामावून घेतले जावे.आदी.११ मागण्यांकडे ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांचे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी महासंघातर्फे कोल्हापूर येथील बिंदू चौक येथे दि.१ जानेवारी २०२२ पासून बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार असून या आंदोलनात सहभागी होण्यासाठी शनिवार दि.८ जानेवारी रोजी रायगड जिल्ह्यातून चारशे कर्मचारी सहभागी होणार असल्याची माहिती संघटनेचे जिल्हाध्यक्ष मंगेश म्हात्रे यांनी दिली आहे.

याबाबत महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी महासंघातर्फे राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ व प्रधान सचिव यांना महाराष्ट्रातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना वेतन श्रेणी मिळणे, किमान वेतनाची अंमलबजावणी करणे, उत्पन्न वसुलीची अट, लोकसंख्येचा आकृतीबंध रद्द करणे आदी.मागण्यांचे एक निवेदन सादर करण्यात येऊन मागणी करण्यात आली आहे.

यामागण्यांकडे ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांचे लक्ष वेधण्यासाठी महासंघातर्फे कोल्हापूर येथील बिंदू चौक येथे राज्य स्तरावरील बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष प्रा.तानाजी ठोंबरे, सरचिटणीस नामदेव चव्हाण कार्याध्यक्ष मिलिंद गणवीर, उपाध्यक्ष बबन पाटील, ड.सुधीर टोकेकर,उज्वल गांगुर्डे, वसंतराव वाघ, हरिश्चंद्र सोनावणे, संघटन सचिव मंगेश म्हात्रे,ए.बी.कुलकर्णी, सखाराम दुर्गुडे, चिटणीस अमृत महाजन, किरण पांचाळ, श्याम चिंचणे, निळकंठ ढोके, ॲड.राहुल जाधव, कोषाध्यक्ष तुकाराम भस्मे यावेळी उपस्थित होते.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## नववर्षाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेची सर्वत्र कडक कारवाई

सूचनेप्रमाणे काल ३०डिसेंबर पासून महापालिका आणि पोलिस विभागाच्याच्यावतीने कारवाईस सुरूवात करण्यात आली असून चारही प्रभागातून जवळपास ९५ हजार रूपयांचा दंड आकारण्यात आला. नागरिकांनी नववर्षाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या नियमांचे पालन करण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या आहेत.

## येत्या काळात जनता काँग्रेसच्या बाजूने राहील : महेंद्र घरत

पाहायला मिळत आहे. देशाची भाजपा सरकारच्या काळात विस्कटलेली घडी नीट बसवायची असेल काँग्रेस सत्तेत आल्याशिवाय पर्याय नसून शेतकरी वर्गाच्या न्याय हक्कासाठी ही काँग्रेस लढत असताना सत्तेचा वापर करून भाजपाकडून दडपशाही वापरली जात आहे. तसेच भाजपा गेल्यावर किती ही पापे केली असली तरी धुवून जातात असा ही टोला लगावत खोपोलीतील जेवढे बेडकं उडा मारून पक्षाबाहेर गेलेत ते पुन्हा येतील, असा आशावाद घरत यांनी व्यक्त केला. खोपोली शहर अध्यक्ष रिचर्ड जॉन यांच्या कार्यप्रणालीचे कौतुक करीत खोपोली काँग्रेसच्या कामगिरीचे संपूर्ण जिल्हा काँग्रेसने आदर्श घ्यावा असा ही सल्ला दिला. शहर अध्यक्ष रिचर्ड जॉन म्हणाले की, स्थापनेपासून आजवरच्या काँग्रेसच्या कामगिरीची माहिती देत काँग्रेसचे देशासाठी असलेल्या योगदानाची सविस्तर माहिती मांडली. सुत्रसंचालन युवक अध्यक्ष ॲड. संदेश धावारे यांनी केले.

यावेळी जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, जेष्ठ नेते मुलानी, युवक अध्यक्ष निखिल ढवळे, जेष्ठ नेते कृष्णा पारांगे, शहर अध्यक्ष रिचर्ड जॉन, इंटक अध्यक्ष अरुण गायकवाड, महिला अध्यक्ष रेखा जाधव, युवक अध्यक्ष ॲड. संदेश धावारे, माजी नगराध्यक्षा नुरजहा शेख, कामगार नेते अमिर खान, कुणाल जाधव, इरशाद शेख, सागर जाधव, महेमूद शेख, सईद शेख, शरिफा शेख आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## महावितरणला चार दिवसांनी जाग

पडली. स्थानिकांनी त्याबाबत महावितरण कडे टाकणारी केल्या,मात्र तीन दिवस महावितरणचा कोणीही वायरमन चौधरवाडी मध्ये पोहचला नाही आणि त्यामुळे येथील वीज पुरवठा सुरु झाला नाही.

शेवटी जिल्हा परिषद सदस्या रेखा भास्कर दिसले यांनी महावितरण कंपनीच्या उपअभियंते यांना खडसावले आणि नंतर आज ३० डिसेंबर रोजी नवीन विजेचे खांब घेऊन महावितरण कंपनीचे कडाव येथील शाखा अभियंता पोहचले आणि विजेचे खांब उभे करण्यास सुरुवात केली आहे. दुसरीकडे ते विजेचे खांब दिवसा कोसळले असते तर मोठी हानी चौधरवाडी मध्ये होऊ शकली असती. दरम्यान,तब्बल चार दिवसांनी चौरवाडी मध्ये विजेची सुविधा उपलब्ध झाली आहे.

## अटल करंडक एकांकिका स्पर्धेच्या प्राथमिक फेरीला पुण्यात उत्स्फूर्त प्रतिसाद

अमोल खेर, कार्यसमिती सदस्य अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ, केंद्रप्रमुख संकेत मोडक यांनी नियोजन पाहिले, तर परीक्षक म्हणून प्रमोद शेलार व अभिजित झुंझारराव यांनी कामगिरी बजावली.

या ठिकाणी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष व पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांनी तेथे भेट दिली. या वेळी त्यांचे स्वागत करण्यात आले, तर त्यांनी आयोजकांचे कौतुक करून स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. आगामी काळात रायगड व मुंबई या दोन केंद्रांसाठी खांदा कॉलनीतील सीकेटी महाविद्यालयात प्राथमिक फेरीचे आयोजन करण्यात आले आहे. रायगड केंद्रासाठी २ जानेवारी रोजी, तर मुंबई केंद्रासाठी ६, ७, ८, ९ जानेवारी या कालावधीत प्राथमिक फेरी होईल. त्यानंतर सर्व ठिकाणच्या प्राथमिक फेर्यांतून २४ एकांकिकांची महाअंतिम स्पर्धेसाठी निवड केली जाणार आहे. मग महाअंतिम फेरी पनवेल येथील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात २८, २९, ३० जानेवारी रोजी होणार आहे.

## गव्हाण न्हावा गावांचा पाणीपुरवठा तातडीने सुरळीत करा : ना.आदिती तटकरे

गावांचा पाणीपुरवठा सुरळीत करा असे आदेश दिले.

भविष्यात सिडको हद्दीतील वाढणारी लोकसंख्येला मुबलक पाणीपुरवठा व्हावा म्हणून उपमुख्यमंत्र्यांच्या पातळीवर जानेवारी महिन्यात संबंधीत मंत्री, अधिकाऱ्यांची बैठक बोलावून रानसई धरणाची उंची वाढवणे. बाळगंगा व इतर पुनाडे, उरण धरणांचा प्रश्न सोडविण्यासाठी बैठक बोलावून चर्चा केली जाईल असे सांगितले. यावेळी पालक मंत्री अदिती तटकरे, खासदार सुनिल तटकरे, रा. जि. काँ. क. अध्यक्ष महेंद्र घरत MIDC चे मुख्य अभियंता कैलास शिंदे, न्हावा माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, गव्हाण सरपंच सौ. माई भोईर, किरण पाटील उपसरपंच न्हावा, विजय घरत उपसरपंच गव्हाण आदी उपस्थित होते.

# पाली बस स्थानकाजवळील मटका जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा

## दीड लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल व रोख रक्कम आणि २ जण ताब्यात

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पाली बस स्थानकाजवळील शिवसेना भवन कार्यालयाच्या पाठीमागील बाजूस असणा-या गल्लीत सुरू असलेल्या मटका जुगार अड्ड्यावर मंगळवारी (ता.२८) पाली पोलिसांनी छापा टाकला आहे. या छाप्यात तब्बल १,६७,३०० किमतीचा मुद्देमाल व रोख रक्कम आणि २ जण ताब्यात घेण्यात आले आहेत.

याबाबत सविस्तर माहिती अशी की पोलीस कॉन्स्टेबल अतुल चंदनशिवे व पोलीस नाईक शेडगे हे बीट मार्शल पेट्रोलिंग डयुटीकरीता हजर होते. यावेळी सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित साबळे यांना या ठिकाणी अवैध मटका धंदा सुरू असल्याची माहिती गुप्त बातमीदार मार्फत मिळाली. त्यानुसार सदर बाबत सहाय्यक पोलीस निरीक्षक तृप्ती बोराटे यांना कळवून त्यांच्या मार्गदर्शनाने चंदनशिवे व सहाय्यक पोलीस निरीक्षक अजित साबळे, पोलीस नाईक म्हात्रे व शेडगे यांनी छापा टाकला. यावेळी पोलीसांनी धावत जावून दोन संशयितांना पकडले. यावेळी त्यांच्याकडे एक पावती बुक, पावत्या इतर साहित्य रोख रक्कम व स्कुटी मोटारसायकल मिळून आल्या आहेत.

# नोकर भरतीमध्ये स्थानिक प्रकल्पग्रस्तांना सामावून घेण्याची शिवसेनेची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**



शिवसेना जिहाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्या मार्गदर्शनाखाली, महाराष्ट्र शासनाच्या कल्याणकारी धोरणांनुसार १००% टक्के नोकर भरती स्थानिक प्रकल्पग्रस्त, इतर प्रकल्पग्रस्त व बेरोजगारांना प्राधान्याने सामावून घेणे आवश्यक असताना, बाहेरील तालुक्यातील व जिल्ह्यातील नोकर भरती करून, स्थानिकांवर अन्याय होत आहे या संदर्भात आज पनवेल महानगरपालीका आयुक्त मा.श्री. गणेश देशमुख साहेब यांना पनवेल महानगरपालिका अंतर्गत नोकर भरती बाबत निवेदन देण्यात आले.

या प्रसंगी महानगर प्रमुख रामदास शेवाळे, तालुका संपर्कप्रमुख योगेश तांडेल, महानगर समन्वयक गुरूनाथ पाटील, उपमहानगर प्रमुख दिपक घरत, नवीन पनवेल शहरप्रमुख यतीन विनायक देशमुख, खारघर शहरप्रमुख प्रकाश गायकवाड, पनवेल शहर संघटक प्रवीण जाधव, उपशहर प्रमुख ज्ञानेश्वर भंडारी, युवासेना उपजिल्हा अधिकारी अवचित राऊत, विभाग संघटक रामचंद्र देवरे आदि पदाधिकारी उपस्थित होते.

# समाजाने देशातील लोकशाही टिकविण्यासाठी प्रसार माध्यमांची उपयुक्तता ओळखुन पत्रकार आणि वृत्तपत्रांना मदत करावी : ना.कपिल पाटील



**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

प्रसार माध्यामाचा प्रभाव कमी झाला तर लोकशाही कमकुवत होईल, त्यामुळे समाजानेच माध्यमांची उपयुक्तता ओळखुन वृत्तपत्रांना मदत करावी. पत्रकारांनीही कोणाच्या सांगण्यावरून बातमी न देता खरी माहिती द्यावी, म्हणजे विश्वास वाढेल, असे केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांनी सांगून प्रबोधनाचे मार्केटिंग होणार नाही याची खबरदारी पत्रकारांनी घ्यावी, असे आवाहनदेखील केले.

ठाणे येथील राम गणेश गडकरी रंगायतन येथे महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या १६ व्या अधिवेशनप्रसंगी प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांच्या हस्ते उदघाटन झाले. त्यावेळी प्रमुख अतिथी म्हणून केंद्रीय मंत्री कपिल पाटील बोलत होते. याप्रसंगी रायगड जिल्ह्यातील पोलादपूरचे ज्येष्ठ पत्रकार व जिल्हा अध्यक्ष शैलेश पालकर आणि शिवव्याख्याते प्रशांत देशमुख यांचा मान्यवरांच्याहस्ते दुसऱ्या सत्रांत सत्कार करण्यात आल्याने रायगडचा ठसा या अधिवेशनावर उमटलेला दिसून आला.

याप्रसंगी सरचिटणीस विश्वास आर-ोटे, कार्याध्यक्ष राकेश टोळ्ये, वृत्तवाहिनी संघाचे प्रदेशाध्यक्ष मनिष केत, प्रदेश प्रसिद्धीप्रमुख नवनाथ जाधव. मुंबई विभागीय अध्यक्ष सागर जोंधळे, ज्येष्ठ पत्रकार अभिजीत राणे, मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष प्रविण सपकाळे, विदर्भ विभाग प्रमुख बाळासाहेब देशमुख, नागपूर विदर्भ पूर्व अध्यक्ष महेश पानसे, मंत्रालय संपर्कप्रमुख नितीन जाधव, प्रकाश गायकवाड, खानदेश विभागीय अध्यक्ष किशोर रायसाकडा, उदय मूळगुंद, ठाणे ग्रामीण जिल्हाध्यक्ष भगवान चंदे, कोकण विभागीय सचिव किशोर पाटील, कोकण विभागीय कार्याध्यक्ष राजेंद्र बोडके, पश्चिम महाराष्ट्र हल्लाविरोधी समिती प्रमुख सुभाष डोके याच्यसह सर्व विभागीय अध्यक्ष व राज्यभरातून ५०० पेक्षा जास्त पत्रकार उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या कामाचे कौतुक करून केंद्रीय स्तरा-वरील मागण्यांसाठी मदत करण्याची ग्वाही दिली तर पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी वृत्तपत्र व पत्रकारांसमोर समस्या आणि वृत्तपत्र आर्थिक पातळीवर आत्मनिर्भर होण्यासाठी स्वस्तात अंक विक्री करण्याचे पारंपरिक धोरण बदलावे तर या क्षेत्रात काम करणाऱ्यांना रोजग-ाराचे स्थैर्य मिळेल, असे सांगुन पत्रकार संघाच्या वर्षे भरातील कामाचा अहवाल सादर केला. सरचिटणिस विश्वास आर-ोटे व कोकण विभागिय अध्यक्ष नितीन शिंदे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी मान्यवरांच्याहस्ते पारसनाथ रायकर यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले तर जेष्ठ नगरसेवक संजय तरे यांना समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ज्येष्ठ नाट्यनिर्माते स्वर्गीय दादाजी घोसाळकर यांना कलारत्न तसेच तरुलता धानके यांना प्रशासकीय भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले तसेच शिवव्याख्याते प्रशांत देशमुख-साहित्यिक पुरस्कार आणि रायगड जिल्हा अध्यक्ष व पोलादपूरचे ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर यांचा यावेळी विशेष सन्मान करण्यात आला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# माजी आ.तुकाराम काते यांच्या हस्ते दिनदर्शिका २०२२चे प्रकाशन



**दै.रायगड नगरी । तळा**

महाराष्ट्रीय यादव चॅरिटी ट्रस्ट दिनदर्शिका २०२२चे प्रकाशन शिवसेना माजी आ.तुकाराम काते यांच्या शुभ हस्ते दादर येथील श्रीकृष्ण सभगृह नायगाव दादर येथे मोठ्या उत्साहात पार पडले या प्रकाशन सोहळ्यासाठी ट्रस्टचे तळा शाखा मुंबई अध्यक्ष अनिल कोटकर, स्थानिक तालुका अध्यक्ष खेळू वाजे,तळा तालुका विश्वस्त सौ. सुप्रिया पागार, शाखा चिटणीस अनंत तांबडे, सहचिटणीस सुनिल रिकामे आणि समाज बांधव उपस्थित होते.

ट्रस्टच्या माध्यमातून सलग दुसऱ्या वर्षी दिनदर्शिका छापण्याचा संकल्प सर्व पदाधिकारी यांनी काही ठराविक कालावधी असताना हाती घेतला कोविडचे आर्थिक संकट असतांना देखील हा उपक्रम हाती घेतल्यानंतर अल्प–ावधीतच तळा तालुक्यातील समाज बांधवांनी जाहिरातीच्या माध्यमातून दिनदर्शिका तयार करण्यासाठी प्रेम रुपी सहकार्य केले म्हणून सर्व जाहिरातदारांचे आणि समाजबांधवांचे तळा शाखेकडून जाहीर आभार मानून सर्व पदाधिकारी यांचे कौतुक माजी आ.तुकाराम काते यांनी केले त्याचप्रमाणे महाराष्ट्रीय यादव चॅरिटी ट्रस्ट ही गवळी समाजाची शिखर संस्था असून ट्रस्टची ध्येयधोरणे योजना समाज बंधवांपर्यंत पोचविण्याचे काम पदाधिकारी यांनी करावे असे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले. यावेळी शासकीय नियमांचे पालन करत दिनदर्शिका २०२२ चे प्रकाशन करण्यात आले. सर्व समाज बांधवांना मोफत दिनदर्शकेचे वाटप करण्यात येइल सर्व स्थानिक शाखा सदस्यांनी संपर्क साधून दिनदर्शिका यादी प्रमाणे वाटप करण्याचे आवाहन तालुका अध्यक्ष खेळू वाजे आणि अनिल कोतकर यांनी केले आहे.

# मनसे कार्यकर्ते राष्ट्रवादीत

**दै.रायगड नगरी । नागोठणे**


रायगड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार सुनील तटकरे, जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. कु.आदितीताई तटकरे व युवकांचे प्रेरणास्थान असलेले विधानपरिषदेचे आमदार अनिकेत तटकरे यांच्या कार्यपद्धतीवर प्रभावित होऊन तसेच या तिघांच्या कर्तृत्व, नेतृत्व आणि वक्तृत्व अशा तिहेरी संगमाच्या जोरावर रोहा तालुक्यातील व नागोठण्याजवळील वांगणी गावातील तरुणांनी मनसेला सोडचिठ्ठी देत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. सुतारवाडी येथील राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्ष कार्यालयात रविवारी (दि.२६) सकाळी संपन्न झालेल्या या प्रवेश सोहळ्यात आ. अनिकेतभाई तटकरे यांनी मनसे कार्यकर्त्यांचे व इतर तरूणांचे राष्ट्रवादीत स्वागत केले.

प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांमध्ये मनसेचे कार्यकर्ते व वांगणी ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच चेतन दळवी, निलेश शिर्के, राकेश शिर्के, अशोक भिसे, संतोष स. ठाकुर, सुभाष मोरे, महेश शिर्के, अनिल लाड, भूषण दळवी, गणेश तेलंगे, सोहम दळवी, सतीश शिंदे, चंद्रकांत ठाकूर, गणेश मांडे, विश्वास तेलंगे यांनी आज सुतारवाडी येथे आमदार अनिकेत भाई तटकरे यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहिर प्रवेश करत हातावर घड्याळ बांधले. या पक्षप्रवेश कार्यक्रमास राष्ट्रवादीचे काँग्रेसच्या पेण विधानसभा मतदार संघाचे कार्याध्यक्ष व नागोठणे विभागीय नेते शिवरामभाऊ शिंदे, विधानसभा मतदारसंघाचे उपाध्यक्ष विलास चौलकर, जेष्ठ नेते चंद्रकांत जांबेकर, हरीषशेठ काळे, नागोठणे ग्राम पंचायत माजी सरपंच लियाकत कडवेकर, रोहा तालुका राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे अध्यक्ष अक्षय नागोठणेकर, नवनिर्वाचित ग्रामपंचायत सदस्य राजेश पिंपळे, नागोठणे शहर युवक अध्यक्ष कुणाल तेरडे , युवा नेते ॲड. श्रीकांत रावकर, प्रथमेश काळे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे नागोठणे शहर अध्यक्ष केतन भोय, उमेर सांगडे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र स्केटिंग संघातील ठाकरे क्रीडा संकुलाच्या खेळाडूंनी मारली बाजी

**दै.रायगड नगरी । मुंबई**

५९ वी अखिल भारतीय रोलर स्केटिंग चॅम्पिशीप २०२१ ही स्पर्धा चंदीगड येथील मोहाली स्टेडियम येथे नुकतीच पार पडली १५ राज्यांच्या सुमारे २०० खेळाडूंनी भाग घेतला होता स्पर्धेत महाराष्ट्र संघाने भाग घेत २२ खेळाडू सहभागी झाले होते यात प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाच्या १५ खेळाडूंची महाराष्ट्र संघात निवड झाली होती महाराष्ट्र संघाच्या प्रशिक्षिका आदेशा सिंग होत्या त्या प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाच्या प्रशिक्षिकाही आहेत. ठाकरे संकुलाच्या सर्वच खेळाडूंनी पदके मिळविली आहेत, त्यांची नांवे या प्रमाणे आहेत.



वय वर्षे ७ वर्षाखालील १. शिया चौकेकर सुवर्णपदक २. जियारा जानी रौप्य पदक वय वर्षे ९ ते ११ १. रिधम ममानिया २ सुवर्ण आणि २ रौप्य २.कृष्णा सावला १ सुवर्ण आणि २ रौप्यपदके ३. शिवाह नवला १ सुवर्ण, १ रौप्य १ कांष्य पदक ४. रिचा जैन १ सुवर्ण,१ रौप्य पदक ५. सान्या सजनवाल१ रौप्यपदक वयवर्षे ११ ते १४ १. नैशा मेहता ३ सुवर्ण पदक २. अमाइरा गिलानी२ सुवर्ण , १ रौप्य पदक ३. रिवा अगरवाल २ सुवर्ण ,१ कांस्य ४.हिर सुरती १ सुवर्ण पदक ५.टिया नरोना १ सुवर्णपदक ६. अहना शाह २ सुवर्ण पदके ७. दनया समानी १ सुवर्ण पदक वय वर्षे १४ ते १७ १. तविशी खैरवार २सुवर्ण, १ कांस्य पदक २. हर्षिता रावतानी २ सुवर्ण पदके ३. अंतरा शाह २ सुवर्णपदके ४. कनिशा देसाई २ सुवर्णपदके ५. तविशी खैरवार २ सुवर्णपके वय वर्षे १७ वर्षांवरील १. यशस्वी शाह १ सुवर्णपदक स्केटिंग फ्रीस्टाईल १.शौर्यवीर वर्मा १ सुवर्णपदक २. ओम गुजराती १ सुवर्ण पदक स्लोम स्केटिंग १. सितांशु निसार सुवर्णपदक यांनी महाराष्ट्र स्केटिंग संघातील प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाच्या बहुतेक खेळाडूंनी पदके मिळविली आहेत.

ही मुले यशस्वी होण्यासाठी प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाचे अध्यक्ष अरविंद रमेश प्रभू, सचिव डॉ मोहन राणे, प्रशिक्षिका आदेशा सिंग यांचे मोलाचे सहकार्य लाभले

# घरात प्रवेश करून मोबाईल फोनसह इतर वस्तूंची केली चोरी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

घरात झोपलेले असल्याचे पाहून अज्ञात चोरट्याने राहत्या घराच्या भिंतीला असलेली सिमेंटची खिडकी काढून त्यावाटे घरामध्ये प्रवेश करून घरात असलेला ॲड्राईड फोन व इतर साहित्य चोरुन नेल्याची घटना आसुडगाव परिसरात घडली आहे.

मुन्नाकुमार वली राम (४३ रा.सेक्टर ४, आसुडगाव) हे घरात झोपलेले असताना अज्ञात चोरट्याने राहत्या घराच्या भिंतीला अस–लेली सिमेंटची खिडकी काढून त्यावाटे घरामध्ये प्रवेश करून घरात असलेला ॲड्राईड फोन व इतर साहित्य असा मिळून जवळपास १८ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# दर्पण पुरस्कार जाहिर झाल्याने जयपाल पाटील यांचा माणगांव येथे सन्मान

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन तज्ञ, प्राध्यापक, लेखक, कवी तथा जेष्ठ पत्रकार जयपाल पाटील पत्रकारितेत गेले तिन दशकाहून अधिक काळ उत्कृष्ट कार्य करीत आहेत. त्यांना पत्रकारितेतील मानाचा 'दर्पण राज्यस्तरीय पुरस्कार' जाहीर झाला असुन येत्या नववर्षात ६ जानेवारी २०२२ ला पोंबुरले सिंधुदुर्ग येथे गौरविण्यात येणार असल्याने माणगांव तालुका पत्रकार सेवा संघटनेच्या वतिने माणगांव येथिल शासकिय विश्रामगृह येथे सकाळी १०.०० वाजता सर्व पत्रकार सदस्यांचे उपस्थितीत शुभेच्छापर शाल–श्रीफळ–पुष्पगुच्छ देऊन छोटेखानी सन्मान करण्यात आला.



तसेच यावेळी सेवा संघाचे मार्गदर्शक तथा जेष्ठ सल्लागार म्हणुन पाटील यांना सन्मानपूर्वक नियुक्ती पत्र देखिल प्रदान करण्यात आले. यावेळी जयपाल पाटील यांचे मार्गदर्शनात माणगांव निजामपूर विभाग विळे भागाड औद्योगिक वसाहतीतील पॉस्को स्टील या नामांकित कंपनीत आयोजित पत्रकार परिषदेस पत्रकार संघाचे सदस्यां सोबत त्यांनी भेट दिली. तसेच माणगांव येथे जनजागृतीपर आपले आरोग्य आपल्या हाती याउद्देशाने एका क्रिकेट क्रिडा स्पर्धेस भेट देऊन तेथील सर्व खेळाडूंस कोव्हिड प्रतिबंधक मास्कचे वाटप करुन मास्क वापरा, सुरक्षित अंतर पाळा व सॅनिटायजरने हात धुवा ! असा संदेशही देण्यात आला.

# म्हसळा शहरात विनामास्क फिरणे पडणार महागात ; कारवाई होणार

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

कोरोनाबाधितांचा तसेच ओमीक्रोनचा वाढता आकडा पाहता सार्वजनिक ठिकाणी मास्क न वापरणाऱ्यांना यापुढे दंड ठोठावण्यात येणार आहे. काही नागरिक कोणतीही खबरदारी न घेता बेजबाबदारपणे विनामास्क फिरत असल्याने त्यांच्यावर कारवाई होणार आहे. याची सक्तपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ महेंद्र कल्याणकर यांनी दिले आहे.त्या अनुषंगाने म्हसळा शहरात विना मास्क फिरणाऱ्यावर नगरपंचायत आणी पोलीस स्टेशनला कारवाई करण्याचे आदेश उपविभागीय अधिकारी अमित शेडगे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार समीर घारे यांनी दिले आहेत.

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी मास्क वापरणे अत्यंत गरजेचे आहे. मात्र, काहीजण नियमांचे उल्लंघन करत आहेत. त्यामुळे आता सार्वजनिक स्थळी मास्क न वापरल्यास दंडात्मक कारवाई होणार आहे. तसेच रुमालाला मास्क समजले जाणार नाही.रुमाल परिधान करणारी व्यक्ती दंडास पात्र असेल. सदर कारवाई नगर पंचायत, पोलीस प्रशासन करणार आहे. खेडेगावात ग्रामपंचायतला कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच सर्व दुकानदार, हॉटेल व्यावसायिक यांनी सोशल डिस्टनसिंग च्या नियमांचे पालन करावे,जेथे शक्य असेल तेथे सामाजिक अंतर राखा, साबणाने किंवा सॅनिटाइझरने वेळोवेळी हात धुवा,सार्वजनिक ठिकाणी गर्दी टाळण्याचे आव्हान मुख्याधिकारी मनोज उकिरडे यांनी केले आहे.

# तेलाच्या पाकीटाचे पैसे मागितले म्हणून केली हाताबुक्क्यांनी केली मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दुकानदाराने तेलाचे पाकिटाचे एकशे तीस रुपये मागितले असता शिवीगाळ करून हाताबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना उलवे येथे घडली आहे आरोपी नदीम मोहम्मद सिद्दीकी ( वय ३२ उलवे) यांच्याविरोधात न्हावा शेवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उलवे, सेक्टर १७ येथील श्रवणसिंग मांगु सिंह यांचा किराणा दुकानाचा व्यवसाय आहे. त्यांच्या दुकानात नदीम मोहम्मद सिद्दिकी हा आला. यावेळी त्याने तेलाचे एक लिटरचे पाकिट मागितले.

यावेळी दुकान बंद झाले असून पुढच्या दुकानात जाऊन तेलाचे पाकीट घ्या असे त्याला सांगितले. यावेळी नदीम याने जबरदस्तीने दुकानाला लागलेल्या कुलपाची चावी घेऊन दुकान उघडून जबरदस्तीने तेलाचे पाकीट घेऊन गेला. त्याच्याकडे श्रवणसिंग याने पैसे मागितले असता त्यांना शिवीगाळ केली व हाता बुक्क्यांनी मारहाण केली.

त्यानंतर दोन दिवसात तुझा दुकान बंद करून टाकेन व कोणताही व्यवसाय करू देणार नाही अशी धमकी देऊन दुकानातील सर्व सामान अस्ताव्यस्त केले. व दुकानाचे टेबल तोडून नुकसान केले. या प्रकरणी नदीम सिद्दिकी याच्याविरोधात न्हावा शेवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


# दर्पण पुरस्कार जाहिर झाल्याने जयपाल पाटील यांचा माणगांव येथे सन्मान


**दै.रायगड नगरी । पनवेल**

दोन बनावट चेकद्वारे एका व्यक्तीने चेन्नई येथील एका कंपनीच्या बँक खात्यातून ५ लाख ३० हजार रुपये आपल्या खात्यात वळती करुन सदरची रक्कम एटीएममधून काढून घेतल्याचा प्रकार घडला आहे. दिगंबर शांताराम महाडीक असे या व्यक्तीचे नाव असून ॲक्सिस बँकेने दिलेल्या तक्रारीवरुन खारघर पोलिसांनी त्याच्या विरोधात बनावट चेक तयार करुन त्याद्वारे फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे.

सदर प्रकरणातील आरोपी दिगंबर महाडीक चिपळूण येथे राहण्यास असून त्याने जानेवारी २०२० मध्ये चेन्नई येथील फ्युजी इलेक्ट्रीक कंपनीचे ॲक्सिस बँकेचे दोन चेक मिळवून त्यानुसार त्याने दोन बनावट चेक तयार केले होते. त्यानंतर त्याने सदर चेकवर बनावट सही करुन त्यावर अनुक्रमे १ लाख ६५ हजार रुपये आणि ३ लाख ६५ हजार रुपयांची रक्कम टावून दोन्ही चेक खारघर येथील एयु स्मॉल फायनान्स या बँकेतील खात्यात वटविले होते. फ्युजी इलेक्ट्रीक कंपनीच्या ॲक्सिस बँकेच्या खात्यातून तब्बल ५ लाख ३० हजार रुपयांची रक्कम परस्पर काढली गेल्याने फ्युजी कंपनीने ॲक्सिस बँकेकडे याबाबत तक्रार केली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने नवी मुंबईतील ॲक्सिस बँकेच्या क्लियरींग विभागाकडून याबाबत शोध घेतला असता, सदरचे खाते दिगंबर महाडीक याच्या नावे असल्याचे आढळून आले. त्यामुळे ॲक्सिस बँकेच्या अधिकार्यांनी एयु स्मॉल फायनान्स बँकेकडून सदर खात्याची अधिक माहिती काढली असता दिगंबर महाडीक याचे अकाऊंट चिपळूण शाखेमध्ये असल्याचे तसेच त्याने सदरच्या खात्यातून सर्व रक्कम काढून घेतल्याची माहिती त्यांना देण्यात आली. तसेच दिगंबर महाडीक चिपळूण येथे राहण्यास असून सध्या तो सणानिमित्त बाहेरगावी गेला असल्याची माहिती सुध्दा ॲक्सिस बँकेला मिळाली. दिगंबर महाडीक याने अशा पध्दतीने बनावट चेकद्वारे चेन्नई येथील कंपनी आणि ॲक्सिस बँकेची फसवणूक केल्याचे लक्षात आल्यानंतर ॲक्सिस बँकेने त्याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार खारघर पोलिसांनी दिगंबर महाडिक विरोधात गुन्हा दाखल केला आहे.


मा.पांडे साो यांचे कोर्ट

ॲड.भुषण मोरेश्वर म्हात्रे
अर्जदारांचे वकील

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी साहेब प्रथम वर्ग यांचे न्यायालयात

फौ.चौ.अर्ज नं.१३९६/२०२१
ने.ता.०२/०२/२०२२

श्रीमती.रेवंती राम कोळी — अर्जदार

विरुद्ध

ग्रुप ग्रामपंचायत गव्हाण तर्फे
मा.ग्रामसेवक साो — सामनेवाला

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, ज्याअर्थी कै. कृष्णा उर्फ भिकाजी आण्या कोळी हे अर्जदार यांचे नात्याने वडील असून ते दि.१०/०२/१९८० रोजी मौजे : बेलपाडा, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले आहेत. त्याअर्थी अर्जदार श्रीमती.रेवंती राम कोळी यांनी जन्म मृत्यू नोंद अधिनियम १९६९ कलम १३ (३) अन्वये कै.कृष्णा उर्फ भिकाजी आण्या कोळी यांच्या मृत्यूची नोंद करून मिळणेबाबत अर्ज केलेला आहे.

सदरकामी कोणाही व्यक्तीला हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत मे.न्यायालय वरील अर्जदार यांच्या अर्जाकामी पुरावा घेण्याची जन्म–मृत्यू नोंद अधिनियम १९६९ कलम १३ (३) अन्वये कै.कृष्णा उर्फ भिकाजी आण्या कोळी यांच्या मृत्यूची उशिरा नोंद करून मिळणेबाबतचा दाखल केलेला अर्ज मंजूर करील.

आज दि.३०/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक फौ.न्याया, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक फौ.न्याया, पनवेल



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली सदनिका ही पूर्वीचे मालक १) मे.केशर हौसिंग ॲण्ड डेव्हलपमेंट कंपनी व श्री.पी.एन.रेमेशन यांच्यात झालेला असून त्यानंतर सदरचा दस्त २) श्री.पी.एन.रेमेशन व सध्याचे मालक श्री.चंद्रकांत प्रेमसिंह धवन व सौ.इंदजित चंद्रकांत धवन त्यांच्यात झालेला आहे. प्रत्यक्ष मालकी व ताबे कब्जातील मिळकत असून सदरील विद्यमान मालकांनी सदरील सदनिका विकण्याचे मान्य व कबुल केले आहे. तसेच सदर सदनिका ही पूर्णतः निर्वेध व निर्जोखिम असून, त्यांना सदरील सदनिका विकण्याचा, पूर्ण हक्क व अधिकार असल्याचा भरवसा त्यांनी दिला आहे. सबब सदर मिळकतीशी अन्य कोणाचाही कसलाही करार, मदार, गहाण, दान, लिज, लिन, पोटगी इ. अगर कोणत्याही प्रकारचा हक्क व अधिकार अगर कोणत्याही प्रकारचे महसूली अगर दिवाणी दावे प्रलंबित असल्यास, प्रस्तुत नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांत आमचे खालील पत्यावर मुळ कागदपत्रे दाखवून आमची खात्री पटवून द्यावी. उपरोक्त मुदतीत हरकत न आल्यास, सदरील सदनिका ही पूर्णतः निर्वेध, निर्जोखमी व निष्कर्जी असून विद्यमान मालकांस तिचे पूर्ण मार्केटेबल टायटल आहे, तसेच अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा काही एक हक्क, अधिकार व हितसंबंध नाही व असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर कोणाचाही कसलीही हरकत/तक्रार विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन (परिशिष्ट)**

**फ्लॅट नं.६०४, ६ वा मजला, ट्युलिप बिल्डींग, केसर गार्डन सोसायटी, प्लॉट नं.५३, सेक्टर २०, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड, नवी मुंबई. क्षेत्र ६१.७१ चौ.मी. (६६४ चौ.फूट बिल्टअप एरिया)**

तसेच वर नमूद सदनिकेसंदर्भात नोंदणीकृत दस्त जो मे.केशर हौसिंग ॲण्ड डेव्हलपमेंट कंपनी व श्री.पी.एन.रेमेशन यांच्यात दस्त क्र.८००२/२००४ दि.२०/०९/२००४ अन्वये झाला असून सदरचा मुळ दस्त दि.२१/१०/२०२१ रोजी सेक्टर २० खारघर परिसरात हरविला असल्याबाबत खारघर पोलीस स्टेशनमध्ये दि.२३/१२/२०२१ रोजी गु.र.नं. ०२४ अन्वये तक्रार दाखल केलेली आहे. सदरचा दस्त कुणास सापडल्यास तो खालील पत्यावर १५ दिवसांत आणून देण्याची कृपा करावी.

येणेप्रमाणे नोटीस दिली.

पनवेल
दि.२९/१२/२०२१

**सही/–**
**श्री.राजीव गुप्ता**
**ॲडव्होकेट व नोटरी**
**शॉप नं.०३, कनक सरोवर, जुना ठाणा नाका रोड, पनवेल ४१०२०६, जि.रायगड**
**मोबा नं.७३०३१६१३३७/७६६६३६१३३७**



मा.सोनावणे साहेब कोर्ट

अर्जदाराचे वकील : ॲड.सचिन केणी

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात

स्पे.मु.नं.४२/२०२१
नि.नं.१६/ड
ने.ता.२४/०१/२०२२

श्री.जयप्रकाश नारायण त्रिपाठी
वय : ४४ वर्षे, व्यव : धंदा
रा.फ्लॅट नं.११०४, ए–विंग, फोनिक्स हाईटस,
प्लॉट नं.५६, सेक्टर १७, रोडपाली,
कळंबोली, नवी मुंबई ४१०२१८ — वादी

विरुद्ध

श्री.संकेत महेंद्र पुजारा
वय : ४४ वर्षे, व्यव : धंदा
रा.फ्लॅट नं.१०१, पर्ल अपार्टमेंट,
निर्मल लाईफ स्टाईल, रेसिडेन्सी, मोतीनगर,
एल.बी.एस.रोड, मुलुंड वेस्ट — प्रतिवादी

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येत आहे की, वरील वादी श्री.जयप्रकाश नारायण त्रिपाठी, यांनी प्रतिवादी श्री.संकेत महेंद्र पुजारा यांच्या विरुद्ध रक्कम रुपये १६,११,४२०/– इतकी रक्कम वसूल करून मिळण्याकरिता पनवेल येथील दिवाणी न्यायालय व.स्तर या न्यायालयात वसुलीचा दावा दाखल केलेला आहे.

सदरहू दाव्याचा क्र.स्पे.मु.नं.४२/२०२१ असा आहे. सदरहू स्पे.मु. नं.४२/२०२१ या दाव्याकामी प्रतिवादी यांस दाव्यात नमूद केलेल्या पत्यावर नोटीस/समन्स काढले असता सदर प्रतिवादी यांना समन्स/नोटीस बजाविलेल्याचा रिपोर्ट आज रोजी पर्यंत मे.कोर्टात आलेला नाही.

तरी सदर प्रतिवादी यांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, सदर स्पे.मु.नं.४२/२०२१ या दाव्याच्या सुनावणीची पुढील तारीख २४/०१/२०२२ अशी आहे. सदर तारखेस मे.कोर्टात या दाव्याकामी आपणांस कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलांमार्फत हजर न झाल्यास आपणास त्यांनी स्वतः अगर त्यांच्या वकीलांमार्फत हजर न झाल्यास आपणास प्रतिवादी यांस दाव्याच्या समन्स / नोटीसची बजावणी झाली असे गृहीत धरुन आपण प्रतिवादी यांच्या विरुद्ध एकतर्फी दावा सुनावणीचा आदेश केला जाईल.

आज दि.२९/११/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



मा.गोडसे साो

अर्जदाराचे वकील
ॲड.मेहबुब गै. पटेल

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१९१७/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.०५/०२/२०२२

१) श्री.रुपेश रमेश चौधरी
वय : १९ वर्षे, धंदा : शिक्षण
२) श्रीमती.विमला रमेश चौधरी
वय : ३९ वर्षे, धंदा : गृहिणी
३) श्रीमती.पानीदेवी नारायणलाल चौधरी
वय : ६२ वर्षे, धंदा : गृहिणी
सर्व रा.निळकंठ धाम को.ऑप.हौ.सोसा.,
रुम नं.अे–१०१, पहिला मजला, फायनल प्लॉट नं.२९/४,
काळण समाज हॉलजवळ, ठाणा नाका रोड,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार नं.१ यांचे वडील नं.१ यांचे पती व अर्जदार नं.३ यांचा मुलगा कै.रमेश नारायणलाल चौधरी हे दि.२१/०५/२०२१ रोजी मयत झाले असून कै.रमेश नारायणलाल चौधरी यांच्या नावाने मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथे पनवेल महानगरपालिका हद्दीत खालील वर्णनाच्या सदनिका व गाळा मिळकती असून सदर मिळकतींचे कै.रमेश नारायणलाल चौधरी हे रितसर मालक आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड**

**१) निळकंठ धाम को.ऑप.हौ.सोसा., रुम नं.अे–१०१, पहिला मजला, फा.प्लॉट नं.२९/४, काळण समाज हॉलजवळ, ठाणा नाका रोड, पनवेल.**
**क्षेत्र ६२८ चौ.फूट कारपेट + १०९ चौ.फुट टेरेस**
**२) ला–रिवेरिया, रुम नं.६०३, ६ वा मजला, बी बिल्डींग, प्लॉट नं.४९१, ५०५, फा.प्लॉट नं.४९१, पनवेल.**
**क्षेत्र ४७.४७ चौ.मी.कारपेट+बाल्कनी क्षेत्र ६.६९ चौ.मी.,+कपबर्ड क्षेत्र ५.४८ चौ.मी.+टेरेस क्षेत्र ७.०६ चौ.मी.+कार पार्कींग**
**३) शॉप नं.७, तळमजला, रतन मार्केट, सी.टी.एस.नं.९१३ अे, ९१५ बी, ९१६, ९१६/१ ते १० आणि ९१८ पनवेल.**
**क्षेत्र ४५० चौ.फूट कारपेट ह्याचे निम्मे क्षेत्र**

येणेप्रमाणे सदनिका व गाळ्याचे वर्णन असून, सदरहू मिळकतींच्या अनुषंगाने कै.रमेश नारायणलाल चौधरी यांचा वारस दाखला मिळणेकरिता अर्जदार यांनी या मे.कोर्टात अर्ज केला आहे.

वरील अर्जदार हे कै.रमेश नारायणलाल चौधरी यांचे कायदेशीर वारसदार आहेत असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदारांचे हक्काबद्दल कोणासही हरकत घ्यावयाची असल्यास अथवा वारसदाखला देण्यास कोणतीही हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकत घेण्याची आहे. जर या कालावधीमध्ये कोणीही योग्य हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि अर्जदार जर कै.रमेश नारायणलाल चौधरी यांचे वारसपत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.३०/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व मे.कोर्टाच्या शिक्क्याानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल

# संक्षिप्त...

## कसईशेत येथे हनुमान मुर्तीची प्राण प्रतिष्ठा सोहळा

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यातील हातोंड ग्रामपंचायत हद्दीतील कसईशेत ठाकुरवाडी येथे रायगड भुषण ह. भ. प. रामदास महाराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली श्री हनुमंत राय यांच्या मूर्तीची प्राण प्रतिष्ठा सोहळा मोठ्या उत्साहात साजरा झाला. त्यानिमित्ताने दिनांक २५ डिसेंबर ते २६ डिसेंबर या कालावधीत प्राणप्रतिष्ठा महायज्ञ सोहळा आयोजित करण्यात आला होता. शनिवार दिनांक २५ /१२ / २०२१ रोजी वास्तु पुजा, नवग्रह पूजन, होम हवन विधी, हरिपाठ, जलावास, धान्यवास असा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. तसेच सायंकाळी ४ वाजता दिंडी सोहळा तर रात्री ९ नंतर जागर भजन करण्यात आले. रविवार दिनांक २६ / १२ / २०२१ रोजी मूर्ती प्राणप्रतिष्ठा सो- हळा, कळशारोहन, सत्यनारायणाची महापूजा, सामुदायिक हरिपाठ आणि रात्री ९ वाजता गुरुवर्य ह.भ.प. श्री. रामदास महाराज पाटील यांचे सुश्राव्य असे कीर्तन पार पडले. या कार्यक्रमाला महाप्रसाद हातोंड ग्रामपंचायतीच्या सरपंच आशाताई रमेश पाठारे व संदेश सखाराम तवले यांच्या वतीने देण्यात आला. दीपोत्सव कार्यक्रम मोठ्या भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या कार्यक्रमात बोलताना दत्त- त्रेय सकपाळ यांनी कसईशेत ग्रामस्थांचे कौतुक केले. ते म्हणाले की, कसईशेत ग्रामस्थ हे मनमिळाऊ व संकटात धावून जाणारे आहेत. त्यांनी अतिशय परिश्रमाने हनुमानाचे मंदिर उभारले असून समाजापुढे एक चांगला आदर्श घालून दिला आहे. सम्यक क्रांती विचार मंचचे अध्यक्ष तथा पत्रकार मंगेश वाघमारे यांनीही आपले विचार मांडले. ते म्हणाले की, ठाकूर समाज हा प्रामाणिक, कष्टाळू आणि संघटनेने जगणारा समाज आहे. कितीही राजकारण झाले, वाद झाला तरी देखील ठाकुर समाज हा एकत्र बसूनच निर्णय घेतो. गावकीच्या निर्णयाच्या विरोधात कुणीही जात नसल्यामुळे ठाकूर समाजाची प्रगती दिवसेंदिवस होत आहे. ठाकूर समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला असून व्यसनापासूनही हा समाज दूर जाताना दिसत आहे. रायगड भूषण रामदास महाराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वारकरी संप्रदायाची वाढ होत असून आदिवासी समाज देखील वारकरी संप्रदायाच्या मार्गाने चालताना दिसत आहे. ह. भ. प. रामदास महाराज पाटील यांनी हनुमान मंदिराच्या मंदिरासाठी मोफत जागा उपलब्ध करून देणाऱ्या हिरू बामा शिद यांचा सत्कार करून आजच्या युगात फूटभर जागेसाठी भांडणाऱ्या लोकांमध्ये हिरु बामा शिद यांनी फार मोठे दान देऊन समाजापुढे आदर्श निर्माण केला आहे.

# वाहतूक विभागाच्या कारवाईचा नियम मोडणाऱ्या रिक्षाचालकांनी घेतला धसका

## कारवाईमुळे रिक्षाचालकांकडून गणवेश परिधान नियमाचे पालन

**दै.रायगड नगरी । पनवेल**



मागील काही दिवसांपूर्वी वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षा चालकांवर नवी मुंबई वाहतूक विभाग पोलीस उपायुक्त पुरुषोत्तम कराड यांच्या सूचनेनुसार पनवेलमध्ये विशेष कारवाई मोहिम राबविण्यात आली होती. त्या धर्तीवर पनवेल शहर वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक संजय नाळे यांच्या मार्गदर्शनाखाली २० डिसेंबर २०२१ ते २८ डिसेंबर २०२१ या दरम्यान शहरातील एकूण ८३० रिक्षांवर कारवाया करण्यात आल्या. या कारवाईत एकूण १३ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तर ११ रिक्षा चालकांचे लायसन्स देखील निलंबित करण्यात आले होते.

पनवेल शहरातील विना गणवेश, विना बॅच, पुढील सीटवर प्रवासी बसवणे याप्रमाणे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षाचालकांवर वाहतूक विभागाच्यावतीने कारवाया करण्यात आल्या होत्या. एका बैठकीत कारवाईची पूर्व सूचना देऊनही तसेच रिक्षा चालकांनी वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करू नये असे आवाहन करून विविध सूचना देण्यात आल्या होत्या. परंतु रिक्षाचालकांकडून नियमांचे पालन केले जात नसल्याने साधारण ८३० रिक्षाचालकांना वाहतूक विभागाच्या कारवाईस सामोरे जावे लागले होते. रिक्षाचालकांकडून नियमांचे पालन व्हावे, वाहतुकीला शिस्त लागावी हा उद्देश या कारवाईमागील असल्याचे पनवेल शहर वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक संजय नाळे सांगण्यात आले होते. तरीदेखील काही रिक्षाचालक अजूनही नियमांचे उल्लंघन करत असल्याचे वाहतूक विभागाच्या निदर्शनास आले. त्या अनुषंगाने रिक्षांचालकांना वाहतूक विभागाच्या कारवायांना सामोरे जावे लागले होते.

पनवेल शहर वाहतूक विभागाच्या कारवाईचा धसका घेऊन याचा परिणाम म्हणून पनवेल मधील सर्व रिक्षा चालकांनी गणवेश परिधान केल्याचे पाहायला मिळते. आज (गुरुवार दि.३० डिसेंबर) पोलीस निरीक्षक संजय नाळे यांनी रिक्षा थांब्यावर अचानक भेट दिली असता, त्याठिकाणी रिक्षा चालकांनी गणवेश परिधान केले असल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे गणवेशावर बॅच देखील असल्याचे दिसून आले. त्यामुळे वाह- तूक विभागाच्या या कारवाईचा परिणाम म्हणून सकारात्मक बदल दिसून आल्याने याबाबत समाधान व्यक्त केले जात आहे.

# माथेरान नगरपालिकेची शेवटची सर्वसाधारण सभा खेळीमेळीत संपन्न

**दै.रायगड नगरी । माथेरान**



माथेरान गिरीस्थान नगरपालिकेचा कार्यकाळ ह्या ३१ डिसेंबर ला संपत असून त्या पार्श्वभूमीवर पालिकेची आज शेवटची सर्वसाधारण सभा होती माथेरानमध्ये सध्या सुरू असलेल्या घडामोडींचा विचार करता ही सभा वादळी होणार असा सर्वांचा अंदाज असताना सभा मात्र अतिशय शांततेत पार पडली ह्यावेळी अनेक विषयांना मंजुरी देताना मावळत्या सभागृहाच्या अनेक नगरसेवकांनी आपली मते मांडली.

माथेरान नगरपालिकेत मागील काही महिन्यांमध्ये अनेक घडामोडी घडत आहेत त्यातच निवडणूक ही सातत्याने पुढे ढकलली जात आहे त्यामुळे ह्या सभे विषयी सर्वांना उत्सुकता होती ह्या सभेमध्ये अनेक विषयांवर चर्चा होणार असल्याने खडाजंगी होणार असा सर्वांना कयास होता ह्यावेळी सत्तावीस विषयांवर चर्चा होऊन माथेरानच्या पर्यटन विकासासाठी अनेक विकास कामांना मंजुरी देण्यात आली तर आगामी काळात माथेरान नगरपालिका स्वतःचा सीलबंद पाणी बाटल्या विकणारी नगरपालिका बनणार असून येथील नैसर्गिक जलस्तोत्र असलेल्या मॅलेट स्प्रिंग या ठिकाणी हा प्रकल्प उभारणार असून त्याचे वितरण माथेरानमध्ये करणार आहे व त्यासाठी राज्य शासनाने भरीव निधी उप- लब्ध केला असल्याने हा प्रकल्प लवकर मार्गी लागणार असल्याचे ह्यावेळी सांगण्यात आले त्याच प्रमाणे येथील दवाखान्यातील वैद्कीय सुविधा अद्यावत करण्याबरोबर माथेरान मध्ये कायमस्वरूपी दंतचिकित्सक व लॅब चालवणारी प्रशिक्षित व्यक्ती ची नेमणूक व्हावी ह्यावर एकमत झाले त्यामुळे माथेरान मधील रुग्णालय अद्यावत होणार असल्याने येथील नागरिकांना त्याचा फायदा होणार आहे.

माथेरान पालिकेला राज्य शासनाने पाच कोटी इतका भरीव निधी दिला असून त्यामध्ये येथील समाज मंदिरे, अद्यावत प्ले पार्क,स्मशानभूमी विकसित करणे आदी कामे करणार असल्याची माहिती ह्यावेळी देण्यात आली शेवटची सभा असल्याने अनेक नगरसेवकांनी आपली मनोगते व्यक्त केली व आपल्या पाच वर्षांच्या कार्यकाळातील अनुभव सांगितले. मुख्याधिकारी तथा उत्तम प्रशासक सुरेखा भणगे यांनी आपल्या मनोगतामध्ये नगरपालिकेचा लेखाजोखा मांडताना सर्व नगरसेवकांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

> माथेरान पालिकेत शिवसेनेची नगराध्यक्षा म्हणून निवडून गेलेली असताना ही नागरिकांमधून निवडून गे- लेली असल्याने जनतेच्या कामांना प्राधान्य देण्याचा प्रयत्न केला त्यामुळे अनेक जण दुखावले असण्याची शक्यता आहे त्यामुळे अनेकवेळा आरोपांना सामोरे जावे लागले पण आपल्या कामातून माथेरानच्या विकासासाठी पूर्ण योगदान दिल्यामुळे आपल्या पाच वर्षांच्या कार्यकाळसाठी समाधानी आहे.
>
> **प्रेरणा प्रसाद सावंत, नगराध्यक्षा माथेरान**

# बंद ऑफिसमधील घरफोडीत हजारोचा ऐवज लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

एका बंद ऑफिसच्या किचन रुमचा दरवाजा कडीकोयंडा व ऑफिसच्या खिडकीला लावलेली लोखंडी ग्रील तोडून अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश करून रोख रकमेसह चांदीचे शिक्के, पितळी धातूच्या मुर्त्या व महत्वाची कागदपत्रे असा ऐवज चोरुन नेल्याची घटना कोन गावाच्या हद्दीत घडली आहे.

भृगुपती कामताप्रसाद मिश्रा (५०) यांचे एकता बिल्डर्स अ‍ॅण्ड डेव्हलपर्सचे कोन गाव येथे कार्यालय असून त्या ठिकाणच्या किचनच्या रुमचा दरवाजा कडीकोयंडा व ऑफिसच्या खिडकीला लावलेली लोखंडी ग्रील तोडून अज्ञात चोरट्यांनी आत प्रवेश करून ५० हजार रुपये रोख रक्कम, चांदीचे शिक्के, पितळी धातूच्या हत्तीच्या दोन मुर्त्या व इतर महत्वाची कागदपत्रे असा मिळून जवळपास ६४ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरुन नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# सिडकोचे व महापालिकेचे अतिक्रमण पथक घरे तोडण्यास आल्यास महाविकास आघाडी आडवी येणार : बबन पाटील



**दै.रायगड नगरी । पनवेल**

कळंबोली जवळील जाधववाडी परिसरात सिडको व महानगरपालिकेचे अतिक्रमण पथक अतिक्रमण तोडण्यासाठी येणार आहेत. परंतु या रहिवाशांच्या पाठीशी शिवसेना व महाविकास आघाडी ठामपणे उभी असून ही पथके आल्यास महाविकास आघाडी आडवी येईल व हे अतिक्रमण तोडू देणार नाही, असा इशारा शिवसेना जिल्हा सल्लागार बबन पाटील यांनी या पथकाला दिला आहे.

कळंबोली वसाहतीजवळील जाधव वाडी येथे सिडको व महापालिका अतिक्रमण पथक कारवाई करण्यासाठी येणार असल्याचे तेथील रहिवाशांना समजले असता त्यांनी लागलीच स्थानिक नगरसेवक विजय खानावकर यांच्याशी संपर्क साधून आपल्या व्यथा मांडल्या त्याच्या व्यथा ऐकून खानावकर यांनी महाविकास आघाडीचे अध्यक्ष बबनदादा पाटील व सचिव सुदाम पाटील यांच्याशी संपर्क साधला व जाधव वाडी बैठकीला येण्यासाठी निमंत्रित केले, लागलीच बबनदादा पाटील यांनी थोडाही वेळेचा विलंब न लावता बैठकीला उपस्थित राहिले व तमाम रहिवाशांच्या पाठीशी १०० टक्के उभे राहण्याचे आश्वासन दिले व कोणत्याही परिस्थितीत येथील घरांना हात न लावण्याचे अभिवचन दिले.

सदर बैठकीसाठी बबनदादा पाटील अध्यक्ष मविआ यांच्या समवेत सचिव सुदाम पाटील मविआ, नगरसेवक विजय खानावकर, नगर- सेवक रवींद्र भगत व रामदास पाटील शिवसेना नेते व स्थानिक ग्रामस्थ मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# रोजगार हमी योजनेसाठी गीरणे ग्रामपंचायत सरपंच सौ. ज्योती पायगुडे पुढे सरसावल्या

**दै.रायगड नगरी । तळा**



रोजगाराअभावी ग्रामीण भागातील जनतेचे वाढते स्थलांतर थांबावे त्याकरता केंद्र आणि राज्य शासनाने महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना अमलात आणली आहे या योजनेमध्ये ज्या कुटुंबाने किंवा व्यक्तीने रोजगाराची मागणी केली त्याला वर्षाकाठी शंभर दिवस रोजगार देण्याची हमी सदर योजनेत देण्यात आलेली आहे.गीरणे ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ.ज्योती कैलास पायगुडे यांनी रोजगार हमी योजनेचे महत्व सर्वसामान्यांना पटवून १६० जॉब कार्डचे वाटप गिरणे ग्रामपंचायतीत केले.

भारत सरकारचा रोजगार हमी योजनेचा कायदा आहे. त्यात वर्षातले किमान शंभर दिवस रोजगार मिळण्याची हमी आहे. तसेच महाराष्ट्र शासनाचीही स्वतंत्र रोजगार हमी योजना असून, त्यामध्ये मागेल तितके दिवस रोजगार मिळण्याची हमी आहे. यात किमान वेतन दर २३८ रुपये असून त्यासोबत आवश्यक त्या सुविधा आणि संरक्षण याचीही व्यवस्था आहे. ही योजना तळ्या सारख्या भागामध्ये अत्यंत गरजेची असूनही का राबवली जात नसावी? याबाबत गिरणे सरपंच ज्योती पायगुडे यांनी अभ्यास करून जनजागृती केली खरे तर रोजगार हमी योजनेचा कायदा अत्यंत पारदर्शी आणि लोकांच्या हिताचा आहे. त्यासाठी कायद्याप्रमाणे योजनेची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. आम्ही रोजगार हमी योजना सुरू होण्यासाठी लोकांची जागृती केली. जर कायद्यानुसार योजनेची अंमलबजावणी झाली, तर अडचणी राहणार नाहीत याचा दिलासा लोकांना दिला. लोकांना सोबत घेऊन काही गावांत ही योजना राबवण्याचा प्रयत्न केला.

थेट ग्रामपंचायत स्तरावर मोठ्या प्रमाणात कामे उपलब्ध होत असल्याने ग्रामीण भागात उपजीविकेचा प्रश्न सोडविण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना वरदान ठरली आहे. रोजगार हमीच्या कामांवरील मजुरीतही वाढ करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील नागरिकांनी मनरेगाअंतर्गत कामांना सुरुवात करावी, असे आवाहन सरपंच सौ. ज्योती पायगुडे यांनी केले आहे. वैयक्तिक सिंचन विहीर, शेततळे, जनावरांचा गोठा, शेळी पालन शेड, कुक्कुट पालन शेड,वैयक्तिक शौचालय, शोष खड्डा, रेशीम लागवड, वैयक्तिक वृक्ष लागवड, फळबाग लागवड, ढाळीचे बांध, घरकुल नाडेप खत टाके, गांडूळ खत टाके, विहीर पुनर्भरण अशा प्रकारच्या कामांना शासनाने मान्यता दिली असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

प्रशासनात असलेले जडत्व , त्यामुळे शासकीय योजनांविषयी लोक उदासीन आहेत. गावात होणाऱ्या ग्रामसभा या विशिष्ट समूहापुरत्याच मर्यादित राहतात. त्याच्या आयोजनामागे लोकांच्या सहभागाची इच्छा दिसून येत नाही. ग्रामपंचायत कार्यालये कधी तरीच उघडली जातात. गावपातळीवरील शासकीय कर्मचाऱ्यांना लोकांकडे जाण्याची आवश्यकता वाटत नाही. लोकच जेव्हा गरज पडते तेव्हा त्यांना शोधत फिरतात. हे चित्र तालुक्यात असताना कोरोना संकटात सर्वसामान्यांना रोजगार मिळावा या उद्देशाने सरपंच सौ. पायगुडे यांनी उचलेले पाऊल इतर ग्रामपंचायतीसाठी आदर्श ठरू शकते.

# थर्टी फर्स्ट वर ओमायक्रोनचे सावट कोरोना नियमावलीमुळे अनेकांनी केले बुकिंग रद्द

**दै.रायगड नगरी । शिस्ते**

सरत्या वर्षाला निरोप व नववर्षाचे हटके स्वागत करण्यासाठी सारे सज्ज होत असताना अनेकजण कुटुंबासह व मित्रमैत्रिणींसोबत रायगड जिल्ह्यातील श्रीवर्धन तालुक्यातील समुद्रकिनारे सहजसफरी साठी पर्यटकांची मांदियाळी पाहायला मिळत आहे. मात्र नवीन वर्षाच्या उत्साह असला तरी कोरोना सावट काही गेले नसल्याने भीती आहेच.

राज्यभरातील पर्यटकांकडून रायगड जिल्ह्याला पसंती मिळत आहे. जिल्ह्यातील बहुतांश हॉटेल व लॉज यांचे बुकिंग यापूर्वीच फुल्ल झाले आहे. नववर्षानिमित्त नेहमीपेक्षा जास्त दर आकारण्यात येत आहेत. २२ डिसेंबरपासून श्रीवर्धन मध्ये पर्यटक येण्यास सुरुवात झाली आहे. समुद्रकिनारे, धार्मिक स्थळे, गड-किल्ले यांना पर्यटकांनी पसंती दिली आहे. दरवर्षी थर्टी फर्स्टच्या रात्री मजा, मस्ती, नाच, धिंगाणा आणि पार्ट्या करण्यासाठी सर्वच हॉटेल सज्ज झाली असतात मात्र उपस्थितीवर मर्यादा आल्याने तितकासा सेलिब्रेशन होणार नाही हे स्पष्ट झाले आहे.

कोरोणा व ओमिक्रॉन च्या वाढत्या रुग्णसंख्येमुळे जिल्हाधिकाऱ्यांनी कडक अंमलबजावणी चे निर्देश दिले. सरत्या वर्षाला जल्लोषात निरोप देण्यासाठी रायगड जिल्ह्याच्या विविध भागातील रिसॉर्ट, हॉटेल्स हाउसफुल्ल झाली आहेत. श्रीवर्धन मध्ये मोठया प्रमाणात पर्यटक आल्याचे दिसते. त्यामुळे येथील प्रशासन दक्षता घेत आहेत. स्थानिकांनी व पर्यटकांनी कोरोनाचे नियम पाळावे यासाठी तह- सीलदार सचिन गोसावी, सहा. पोलिस निरीक्षक संदीप पोमन तसेच गटविकास अधिकारी उद्धव होळकर यांनी दिवेआगर व बोर्लीपंचतन येथे भेट दिली. समुद्रकिनारी नवीन वर्षाच्या स्वागतासाठी लोकांची गर्दी निदर्शनास येते. या गर्दीमुळे कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. यामुळे येथील सर्व व्यवसायिकांनी कायद्याचे पालन करणे गरजेचे आहे. यामध्ये लसीकरण अपूर्ण असणे, तोंडाला मास्क लावण्यास टाळाटाळ करणे, सामाजिक अंतर न राखणे, या बाबींकडे प्रशासनाचे लक्ष असून कुणीही कायद्याचा भंग केल्यास त्या विरोधात तात्काळ कारवाई केली जाईल.

# वनक्षेत्र परिसरात नवीन वर्षाच्या स्वागतासाठी कुठल्याही पार्ट्या केल्यास कारवाई होणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन वर्षाच्या स्वागतासाठी अनेकजण शहराच्या बाहेर असलेल्या वनक्षेत्र परिसरात पार्ट्या करण्यासाठी येत असतात. परंतु अशा प्रकारच्या पार्ट्या करताना कोणी आढळल्यास घटनास्थळावरील साहित्य हस्तगत करून त्यांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात येतील. तरी नागरिकांनी अशा पार्ट्या टाळाव्यात, असे आवाहन कर्नाळा वन परिक्षेत्र अधिकारी एन.डी.राठोड यांनी केले आहे.

नवीन वर्षाच्या स्वागतासाठी त्याचप्रमाणे सरत्या वर्षाला निरोप देण्यासाठी अनेक जण हे शहरी भागात न थांबता वनक्षेत्र परिसरात पार्ट्या करण्यासाठी येतात. त्या ठिकाणी विविध कार्यक्रमाचे आयोजन करतात. तसेच मोठमोठ्याने गाणी लावणे, डिजे लावणे, फटाके फोडणे, चुलीवर स्वयंपाक करणे, पेटत्या सिगरेटची थोटके उघड्यावर टाकणे यामुळे वनक्षेत्र परिसर असलेल्या भागातील गवताला आग लागून त्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. तसेच येथील असलेले वन्यजीव सुद्धा भयभीत होतात. कित्येकदा ते सैरभर होवून आक्रमक सुद्धा होत असतात. तरी नागरिकांनी वनक्षेत्र परिसरात अशा प्रकारच्या पार्ट्याचे आयोजन करू नये अन्यथा सदर ठिकाणी छापे टाकून त्या ठिकाणी असलेले साहित्य हस्तगत करून संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशारा राठोड यांनी दिला आहे.

# आरसीसी गटार व रस्ता डांबरीकरणाच्या कामाला सुरूवात



**दै.रायगड नगरी । खोपोली**

मागील ५० वर्षात यशवंत नगर परिसराचा जेवढा विकास झाला नाही, तेवढा विकास मागील ५ वर्षात झाला आहे. नूतन लोकप्रतिनिधींचा कार्यकाळ संपण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत विकासपुरूष अशी प्रतिमा असलेले शिवसेना शहर प्रमुख तथा नगरसेवक सुनील पाटील व वनिता हरीश काळे यशवंत नगर परिसराच्या विकासासाठी झटतांना दिसून आले. आरसीसी गटार व रस्ता डांबरीकरणाच्या कामाला आज सुरूवात करण्यात आली.

राष्ट्रीय महामार्गापासून कान्क्रेटीकरण झालेल्या रस्त्यांपर्यंत प्रलंबित असलेल्या यशवंतनगर परिसरातील रस्त्यांचे डांबरीकरण व आरसीसी गटाराचा विषय आज खोपोली नगर परिषद गटनेते तथा नगरसेवक सुनील पाटील यांनी मार्गी लावला. एचपीसीएल गैस पाईपलाईनमुळे हा विषय प्रलंबित असल्याने आज जेष्ठ नगरसेवक व एचपीसीएलचे असिस्टंट मॅनेजर विवेक कुमार दिनकर, सुपरवाईजर सुनील पिंगळे यांच्यासोबत चर्चा करून नगरसेवक सुनील पाटील यांनी हा विषय मार्गी लावला. आरसीसी गटार बांधकाम कामाला आज सुरूवात करण्यात आली. यावेळी शिव सहकार सेना शहर अध्यक्ष हरीश काळे, अझहर भाई राजपूत, महमूद शेख, विजय कुंडले, फिरोज शेख, इम्रान मालदार, गुलाब शिंदे, फैय्याज कुरेशी, शोहेब राजपूत, जलील कुरेशी, राहुल शिंदे, मुकेश शिंदे, सूरज परदेशी, शुभम, संतोष आदी उपस्थित होते.